# देवाने प्रार्थना ऐकली आणि सिंहांची तोंड़े बंद केली

**प्रार्थना:** ''प्रिय पित्या, कृपा करून या अभ्यासाचा उपयोग मुलांना विश्वासूपणे प्रार्थना करण्यास शिकण्यासाठी करून घे.''

मुलांची वये आणि सध्याच्या गरजांना अनुरूप अशा कोणत्याही शैक्षणिक कार्यकृती निवडा.



दानीएल आणि सिंह दानिएल 6 मधील वृत्तांत शिक्षकाने किंवा मोठया मुलाने वाचावा अथवा आठवून सांगावा यावरून देवाने दानीएलच्या प्रार्थनेचे उत्तर देऊन त्याला सिंहांच्या तोंडातून कसे वाचवले ते पहायला मिळते.

विचारा: (प्रत्येक प्रश्नाच्या पुढे उत्तरे दिली आहेत.)

1. राजाचे अधिकारी दानिएलाचा मत्सर का करीत? *(पाहा वचन 3)*
2. राजाने प्रार्थनेविषयी नवा नियम काढावा असे राजाच्या अधिकाऱ्यांना का वाटत होते? *(वचन 5)*
3. राजाच्या नव्या नियमाबद्दल ऐकल्यावर दानीएलने काय केले? *(वचन 10)*
4. दानीएलाची सिंहांच्या गुहेत होता त्या रात्री राजाने काय केले? *(वचन 18)*
5. दानीएलाची सिंहांच्या गुहेतून सुखरूप सुटका कशी झाली? *(वचन 22)*
6. दानीएलाची सिंहांच्या गुहेतून सुखरूप सुटका झाल्यावर राजाने कोणता नवा नियम केला? *(वचन 26)*

वृत्तांताच्या भागांचे नाट्यीकरण करा (दानीएल 6)

ही नाटिका उपासनेच्या वेळी सादर करता यावी यासाठी मंडळीच्या पुढाऱ्यांशी चर्चा करून तशी व्यवस्था करा. मुलांकडून चांगली तयारी करून घ्या.

**मोठया मुलांना** किंवा प्रौढांना पुढील भूमिका द्या:

**निवेदक** वृत्तांत थोडक्यात सांगा. मुलांना त्यांचे संवाद पाठ करण्यास मदत करा.

**राजा** ''राजाचे फर्मान म्हणून एक कागद हातात धरा,''

**दानीएल.**

**लहान मुलांना** पुढील भूमिका घा,

**राजाचे अधिकारी.** हातात राजाचे फर्मान म्हणून एक कागद धरा.

**सिंह** हात पाय टेकून चाला आणि तोंडाने गुरगुर असा आवज करा.

**देवदुत.** हातात कापड धरा.

**सैनिक**

**निवेदक** वचने 1-10 मधून वृत्तांताचा पहिला भाग सांगा आणि मग म्हणा, ''राजाचे अधिकारी काय म्हणतात ते ऐका.''

**राजाचे अधिकारी:** मोठयाने म्हणा, ''राजा आमच्यापेक्षा दानीएलाला जास्त महत्व देतो.''

''आपण याचे काहीतरी केलेच पाहिजे. याच्यावर कोणता आरोप ठेवावा?''

''तो अजिबात चूक करीत नाही!''

''दानीएलाच्या देवाची प्रार्थना करण्याविरूद्ध राजाला फर्मान काढायला लावू!''

**राजा:** अधिकऱ्यांच्या हातात कागद देऊन म्हणा, ''ठिक आहे. तुमच्या म्हणण्या प्रमाणे ही नवी आज्ञा केली आहे. प्रत्येकाने फक्त माझीच प्रार्थना केली पाहिजे.''

**दानीएल:** खुर्चीवर चढून खिडकी उघडल्याचा अभिनय करा, मग गुडघे टेकून म्हणा ''हे देवा मी फक्त तुझीच प्रार्थना करणार आणि दररोज तुलाच धन्यवाद देणार, तुझीच स्तुती करणार.''

**निवेदक:** वचने 11-18 मधून वृत्तांताचा दुसरा भाग सांगा आणि म्हणा, ''राजाच्या अधिकाऱ्यांचे बोलणे ऐका''

**राजाचे अधिकारी:** ''अहो महाराज, दानीएल अजूनही त्याच्या देवाची प्रार्थना करतो.'' ''तुम्ही त्याला सिंहांच्या गुहेतच टाकले पाहिजे.''

**राजा:** ''नाही, नाही! मला तसे काही करायची इच्छा नाही, पण तसा नियमच आहे. त्याला गुहेत टाका आणि वरून गुहेचे दार एक शिळा ठेवून बंद करा. मला, फार वाईट वाटत आहे. आता मला जेवण जाणार नाही की रात्रभर झोपही येणार नाही!''

**सैनिक:** दानीएलाला सिंहांच्या गुहेत टाका.

**सिंह:** गुरगुर करा.

**निवेदक:** वचने 19:22 मधून वृत्तांताचा तिसरा भाग सांगून म्हणा, ''देवदुत काय म्हणतात ते ऐका.''

**देवदुत:** सिंहाचे तोंड कापडाने बांधून म्हणा, ''सिंहांनो, दानीएलाला त्रास देऊ नका.''

**सिंह:** दानीएलाच्या अवतीभवती फिरा आणि जमिनीवर पडून झोपून जा.

**राजा:** ''चला, एकदाची सकाळ झाली!'' (सिंहांच्या गुहेकडेजा)''दानीएल, तू जिवंत आहेस का? तुझ्या देवाने तुझे रक्षण केले का?''

**दानीएल:** ''होय. देवदुताने येऊन सिंहांची तोंडे बांधून टाकली.''

**निवेदक:** वचने 23-28 मधून वृत्तांताचा चौथा भाग सांगून म्हणा, ''राजा काय म्हणतो ते ऐका''

**राजा:** ''मी खूप आनंदात आहे! त्या दुष्ट अधिकाऱ्यांना धेउन या! त्यांना सिंहांच्या गुहेत टाका! आणि आता आपण सर्वजण दानीएलाच्या देवाची उपासना करू या.''

**सैनिक:** अधिकाऱ्यांना सिंहांच्या गुहेत टाका.

**सिंह:** मोठयाने गर्जना करून त्या अधिकाऱ्यांवर तुटून पड़ा

**निवेदक:** विश्वासूपणे प्रार्थना करण्यास शिकवण्यात आम्हांला मदत करणाऱ्या प्रत्येकाचे आभार माना.

**प्रश्न:** मुलांनी हे नाट्यीकरण प्रौढांसमोर सादर केले असेल तर दानीएल आणि त्याची प्रार्थना यावषियी त्यांना वर दिलेले प्रश्न मोठया माणसांना विचारण्यास सांगा.

**मुलांना विचारा:** आम्ही कोणत्या वेळी विश्वासूपणे प्रार्थना केली पाहिजे याची इतर काही उदाहरणे सांगा. (मुलांना उदाहरणे सांगू दद्या.)

सिहांचे चित्र काढा किंवा दाखवा, मुलांना ते काढायला सांगा. पुढच्या उपासनेच्यावेळी मुले ते चित्र मोठया माणसांना दाखवतील आणि लोकांनी आमचा द्वेष केला तरी आम्ही विश्वासूपणे कशी प्रार्थना केली पाहिजे हे यावरून समजते असे स्चष्टीकरण द्या.



**पाठ करा 2 थेस्सल 3:2**

**कविता** तीन मुलांना स्तोत्र 57:4,5 व 6 ह्या शास्त्रभागातून प्रत्येकी एकेक वचन म्हणायला सांगा.



**प्रार्थना.** ''प्रिय प्रभु तू सामर्थ्यशाली आहेस. तू सिंहांची तोंडे बंद करतोस. अम्ही नेहमी तुझ्यावर भरंवसा ठेवू. कठीण अवधड परिस्थितीतही आम्ही तुझी प्रार्थना करू. आमच्या बाबतीत वाईट गोष्टी घडल्या तरी तू सार्वकालीक मृत्यूपासून आमचा बचाव करशील येशूच्या नावामध्ये, आमेन''

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net